# # गीत #

पाहूनी दीप डोळ्यात तुझ्या
उजळती उद्याचे लाख रवी
आशा जगाच्या जागविशी
देऊनि शक्ती पंखास नवी
होशी तू आई, तू होशी गुरुवर
धरती तू होशी, तू होशी अंबर
तुझीच ही माया, तुझीच ही छाया
नमितो तुला...

रुजतील तुझे संस्कार जिथे
अंकुरे ज्योत हृदयात तिथे
त्या तिथे जागते मानवता
ज्या माथ्यावरती हात तुझे
प्रेमभावना तू, दिव्य प्रेरणा तू
लाख संकटांचा करतेस सामना तू
तुझीच ही शक्ती, तुझीच ही भक्ति
नमितो तुला...

पाहूनी दीप डोळ्यात तुझ्या
उजळती उद्याचे लाख रवी
आशा जगाच्या जागविशी
देऊनि शक्ती पंखास नवी
*(पुनरावृत्ती 3 वेळा)*